# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

## // विशेष महासभा बैठकीचे कार्यवृत्त //(ऑनलाईन ॲपव्दारे)

**सभा क्र.:- १९** **दि.१२/०८/२०२०**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि. १२/०८/२०२० बुधवार रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर, सौ.सोनवणे भारती कैलास यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या ऑनलाईन विशेष महासभेचे कार्यवृत्त.

**मा. सौ.सोनवणे भारती कैलास , महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| सोनवणे अश्विन शांताराम | कापसे प्रतिभा चंद्रकांत | खडके विश्वनाथ सुरेश |
| जोहरे प्रिया मधुकर | देशमुख प्रतिभा गजानन | भंगाळे विष्णु रामदास |
| नेरकर सरिता अनंत | पाटील विजय पुंडलिक | सोनवणे राखी शामकांत |
| पोकळे दिलीप बबनराव | सोनवणे सुरेश माणिक | लढढा नितीन बालमुकुंद |
| खान रुकसानाबी गबलु | शेख हसीनाबी शरिफ | बरडे नितीन मनोहर |
| सोनवणे कांचन विकास | पाटील कुलभुषण विरभान | जोशी अनंत हरिश्चंद्र |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | भिल पार्वताबाई दामु | महाजन सुनिल सुपडू |
| शिंदे गायत्री उत्तम | कोल्हे सिंधु विजय | महाजन जयश्री सुनिल |
| कोळी दत्तात्रय देवराम | कोल्हे ललित विजय | शेख शबानाबी सादीक |
| सपकाळे रंजना भरत | बेंडाळे उज्वला मोहन | नाईक प्रशांत सुरेश |
| कोल्हे प्रविण रामदास | राणे गायत्री इंद्रजित | पटेल इब्राहिम मुसा |
| सनकत चेतन गणेश | तायडे सुरेखा नितीन | सोनवणे निता मंगलसिंग |
| चौधरी चेतना किशोर | चव्हाण ज्योती बाळासाहेब | सोनवणे विक्रम किसन |
| सोनवणे मुकुंदा भागवत | मराठे जितेंद्र भगवान | भापसे जिजाबाई अण्णासाहेब |
| काळे अमित पांडुरंग | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| चौधरी मंगला संजय | पाटील रेखा चुडामण | देशमुख सुन्नाबी राजु |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | सोनवणे सुरेखा सुदाम | शेख सैईदा युसुफ |
| सोनवणे धिरज मुरलीधर | ढेकळे सदाशिव गणपत | **स्विकृत सदस्य** |
| काळे दिपमाला मनोज | पाटील राजेंद्र झिपरु | सोनवणे कैलास नारायण |
| पाटील सचिन भिमराव | बालाणी भगतराम रावलमल | त्रिपाठी विशाल राधेशाम |
| भोईटे लताबाई रणजीत | काळे रेश्मा कुंदन | मराठे राजेंद्र नारायण |
| पाटील प्रतिभा सुधीर | पाटील मिनाक्षी गोकुळ | चौधरी महेश रतन |
| पाटील चंद्रशेखर शिवाजी | सोनार रंजना विजय | जैन भागचंद मोतीलाल |
| कापसे मयुर चंद्रकांत | खडके सुनिल वामनराव | |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिष कुलकर्णी, उपायुक्त,श्री.किरण देशमुख, मुख्यलेखापरिक्षक-श्री.संतोष वाहुळे, मुख्यलेखाधिकारी, श्री.कपिल पवार व नगरसचिव श्री.सुनिल गोराणे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी ऑनलाईन सभा सुरु करण्याचे निर्देश दिले.

**नगरसचिव :-** आजच्या ऑनलाईन सभेमध्ये सर्व सन्मा.सदस्यांचे स्वागत आहे. सर्व सदस्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या मोबाईल चे माईक बंद करावे.

**मा.उपमहापौर :-** सर्वांनी आपले माईक बंद करावे.

**नगरसचिव :-** सर्व सदस्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या मोबाईल चे माईक बंद करावे.

**मा.उपमहापौर :-** धिरज सोनवणे माईक बंद करा. मुकुंदा सोनवणे माईक बंद करा.

**नगरसचिव :-** सर्व सदस्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या मोबाईल चे माईक बंद करायचे आहे. सर्व सन्मा.सदस्यांना आजच्या विषेश महासभा क्रं. १९ मध्ये आपले स्वागत आहे. सर्व ऑनलाईन असलेल्या सदस्यांना विनंती आहे की सर्वांनी वंदेमातरम साठी उभे राहावे.

**वंदे मातरमने सभेस सुरूवात करण्यात आली.**

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता सन्मा.सदस्य श्री.आहुजा मनोज नारायणदास , सौ.बारी शोभा दिनकर, श्री.बाविस्कर किशोर रमेश, यांचे रजेचे अर्ज आलेले आहेत ते मा.पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेले आहेत.

**नगरसचिव :-** यानंतर विशेष महासभेच्या विषय पत्रिकेवरील विषय क्रं.०१

**नगरसचिव :- विषय क्रं:- १)** जळगांव शहर महानगरपालिकेच्या सन २०१९-२० चे सुधारीत अंदाज पत्रकासह सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.२३८ दिनांक १३/०३/२०२० अन्वये मान्यता प्रदान केलेली असुन महासभेच्या मान्यतेसाठी आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**मा.महापौर :-** हाडा ताई , हाडा मॅडम बोला. नितीन भाऊ माईक बंद करा.

**मा.उपमहापौर :-** प्रशांत नाईक माईक बंद करा.

**मा.महापौर :-** सौ. शुचिता ताई बोला.

**ॲड. सौ. हाडा शुचिता अतुलसिंह :-** मा.महापौर , आयुक्त साहेब आणि सर्व सन्मा.सदस्य आज सन २०१९-२० चे सुधारीत अंदाज पत्रकासह सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रक महासभेसमोर सादर करीत आहे.

**न कश्चिदपि जानाति किं कस्व श्र्वो भविष्याती !**
**अत: श्र्व: करणीयानि कुर्याददैय बुध्दिमान !!**

अर्थात उद्याचे भविष्य कोणासही माहिती नसते आणि म्हणूनच हुशार , चाणाक्ष , बुध्दीमान व्यक्ती उद्याचे वेळापत्रक तयार करतो . मला वाटते की यातुनच अर्थसंकल्प या संल्पनेचा उदय झालेला असावा . जळगांव शहरासाठीच्या उद्याची तरतूद या अर्थसंकल्पातुन स्थायी समितीने मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95 च्या तरतूदीस अनुसरून प्रशासनाने फेब्रुवारी महिन्यात अंदाजपत्रक सादर केलेले आहे. प्रशासनाने सादर केलेल्या अंदाजपत्रकात स्थायी समितीने वाढ करून मार्च महिन्यात मंजुर केलेले आहे.

महासभा जी अपेक्षित होती स्थायी समिती सभा झाल्यानंतर परंतू संपूर्ण जगावर आलेल्या कोरोनाच्या संकटामुळे महासभा होवू शकली नाही.येत्या काळामध्ये कोरोनाचे संकट लवकरात लवकर दुर व्हाव त्यासाठी आपण सर्वच्या सर्व प्रयत्न करत आहोत. आज संपुर्ण भारतात कोरोनाशी संपुर्ण कोरोना योध्दा लढत आहेत.

तर प्रशासनाने ज्याकाही जमा बाजू मांडलेल्या होत्या त्या जमा बाजु मध्ये काही बदल आम्ही सुचविलेले होते. यामध्ये जी तरतूद प्रशासनाने केलेली होती ती मुळात चुकीची केलेली होती. याच्या डिटेल्स स्थायी समिती सभेमध्ये दिलेल्या आहेत . आता आपली जी ऑनलाईन सभा सुरू

आहे. या ऑनलाईन सभेकरीता माझी मा.महापौरांना विनंती आहे की यावर सविस्तर चर्चा न करता अंदाजपत्रकातील प्रत्येक मुद्दयावर मी सविस्तर माहिती मांडणार नाही . मी फक्त ठळक मुद्दे आपल्यासमोर मांडू ईच्छिते कि, यामध्ये कोणकोणत्या प्रकारे वाढ होवू शकते बजेट मध्ये काही स्थायी समितीने केलेल्या सुधारणा करण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्याची जर प्रशासनाने अंमलबजावणी केली. तर याच्यात घरपट्टी चा विषय आहे . यामध्ये स्थायी समितीने काही वाढ सुचविलेली आहे. नगररचना विभागाचे सुध्दा उत्पन्न वाढणार आहे यात अनधिकृत गुंठेवारी जी आहे ती जर आपण नियमित केली. तर आपल्याला याचे खुप मोठं उत्पन्न मिळणार आहे. तसेच अनधिकृत बांधकामे जी आहेत तसेच जे लेआउट आपल्याकडे मंजुरीसाठी येतात त्यांना नगररचना परवानगी देवू शकत नाही आणि ते जर आपण योग्य ती फी घेवुन नियमित केले तर त्याच्याने सुध्दा आपल्याला खुप मोठी लक्षणिय वाढ होवू शकणार आहे. त्यामध्ये काही नविन गोष्टी स्थायी समितीने सुचविलेल्या आहे. तसेच अनधिकृत बांधकामांचे सुध्दा आकारणी करून याच्यामध्येही वाढ होणार आहे. तरी याबाबत प्रशासनाने त्याची अंमलबजावणी केली तर याच्यामध्ये आपल्याला अधिक उत्पन्न वाढ होणार आहे. त्यानंतर एक महत्वाचा मुद्दा असा आहे की, आपण जर जे व्यापारी गाळे भाड्याची जी तरतूद याच्यामध्ये केलेली होती ती तरतूद प्रशासनाला प्रस्ताव पाठविण्यास जो कोरोना मुळे जो कालावधी लागलेला आहे. त्याच्यामुळे व्यापारी गाळेहस्तांतरण चे जे शुल्क आपल्याला मिळणार आहे. त्यांचे ही उत्पन्न आपल्याला मिळणार आहे. त्यांचे गाळे हस्तांतरण करण्याचा जो प्रश्न निर्माण झालेला आहे . आज जी महासभा आहे बजेटच्या संदर्भामध्ये त्या महासभेमध्ये गाळेधारकांच्या संदर्भातील डॉकेट येणं अपेक्षित होत. त्यासाठी लोकप्रतिनिधींनी आवश्यक त्या सगळया बाबी तपासल्या आहेत. वेळोवेळी तर प्रशासनाला निवेदन आहे की याच्यामध्ये जी लक्षणिय वाढ आहे ती अपेक्षित आहे. नंतर महत्वाचा मुद्दा तो असा आहे की , आपले गाळे हस्तांतरण शुल्क जे आपण वसुल करणार आहोत. त्याची पुर्तता लवकरात लवकर आपण करायची आहे. यामध्ये सुध्दा मोठी रक्कम आपल्याला अपेक्षित आहे. या बजेट मध्ये आपल्याला ही तरतूद करता येईल. यामध्ये प्रशासनाने ज्या गोष्टी नोंदी केलेल्या आहेत. त्यामध्ये सुध्दा प्रशासनाला सुचना दिलेल्या आहेत. फुले मार्केट व सेंट्रल फुले मार्केट मधील व्यापाऱ्यांनी मध्यंतरी बऱ्याच मोठया रकमेचा भरणा केलेला आहे सदर मार्केटचे नुतनीकरणाचा प्रस्ताव विचाराधीन आहे. प्रशासनाकडून सदर गाळयांच्या नुतनीकरणाचा प्रस्ताव बजेट नंतरच्या महासभेपुढे येणे अपेक्षित होते. सदरचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर उत्पन्नात वाढ होईल.

तसेच आपले जे प्रभाग समिती कार्यालये आहेत त्यांचे आपण प्रभाग समिती निहाय त्यांचे मिनी नगरपालिकेत रूपांतर करायचे आहे. तसेच प्रभाग अधिकारी यांच्या अधिकारांमध्ये वाढ करायची आहे. तर आपण ह्या सगळया गोष्टी बजेट मध्ये प्रस्तावित करत आहोत. तर या सगळया गोष्टी साध्य करून घेण्यासाठी प्रभाग समिती कार्यालयांचा उपयोग करून घेता येणार आहे. तसेच त्याठिकाणी बांधकाम विभाग ,आरोग्य विभाग , अतिक्रमण विभाग , अग्निशमन विभाग, पाणी पुरवठा विभाग, स्वच्छता विभाग , घरपट्टी विभाग हे सगळे आपल्याला प्रभाग समित्यांना जोडायचे आहेत आणि हे विभाग प्रभाग समित्यांना जोडल्यानंतर त्याठिकाणी नागरीकांच्या ज्या तक्रारी आहेत

त्या कमी होतील व त्यामुळे प्रशासन मजबुत होणेस मदत मिळेल आणि त्यामुळेही आपल्याला त्याचा उत्पन्न वाढीसाठी चांगला हातभार लागणार आहे. त्यामुळे प्रशासनाने या सुचनांची तात्काळ दखल घेवुन त्याचे नियोजन करून प्रशासनाने त्याची तात्काळ अंमलबजावणी करावी. याचा फायदा आपल्याला होणार आहे आणि त्यानंतर अग्निशमन विभागाकडील ज्या फायर फायटर आहेत. त्यांना आपल्या जळगांव शहरातील ज्या उंच इमारती आहेत. त्यांची संख्या वाढते आहे तर अशा वेळेला आपल्या अग्निशमन विभागाची गाडी जी आहे ती पुरेशी पुर्ण पडत नाही. त्याबाबत सुध्दा स्थायी समितीने तरतूद सुचविलेली आहे. तर त्या गाडया अद्दयावत घेणे येथे आवश्यक आहे. दोन फायटर आपल्याकडे असणे आवश्यक आहे. ज्या टेक्निकल बाबी आहेत त्या आपल्याला त्याकरीता स्थायी समितीने ती एक वाढ केलेली आहे. त्याच बरोबर स्थायी समितीने फोम फायटर घेणे गरजेचे कारण हे जळगांव शहराचे हिताचे आहे ते आवश्यक आहे. त्याची तरतूद येथे केलेली आहे. तसेच आपले बालगंधर्व नाट्यगृह सुशोभीकरण करणे जेणेकरून आपल्या जळगांव शहराच्या सौंदर्यामध्ये भर पडेल त्याकरीता जी तरतूद केलेली आहे. जळगांव महापालिकेच्या अकाऊंट विभागाच्या टिमने जे अहोरात्र परिश्रम घेतले तसेच सर्व सन्मा सदस्यांच व स्थायी समिती सदस्यांच आणि तसेच या कामात ज्यांनी ज्यांनी योगदान दिले आहे त्या सगळयांचे मी मन:पुर्वक आभार व्यक्त मानते आणि अंदाजपत्रक तयार करतांना स्थायी समिती सभापती म्हणून मी स्थायी समितीच्या वतीने महासभेला व महापौरांना विनंती करते की, महासभेने या अंदाजपत्रकाला सर्वानुमते मंजुरी प्रदान करावी अशी अपेक्षा आहे . त्याच बरोबर मला अजून एक मुद्दा सांगायचा आहे. आता आपण जे अंदाजपत्रक तयार केलेले होते त्यामध्ये १६० कोटीची वाढ स्थायी समितीने केलेली आहे आणि १०२ कोटींच शिलकीचं हे जे आपलं अंदाजपत्रक सादर केलेले आहे. त्यात कोरोनाच्या पार्श्वभुमिवर आपल्याला नविन ॲडीशनल करायची आहे तर त्यामध्ये प्रशासनाचं असं म्हणणे आहे की , संसर्गजन्य रोगांचे प्रतिबंधात्मक उपाय आणि नियंत्रण या हेडखाली आपल्याकडे फक्त ५ लाखांची तरतूद आपण यापुर्वी केलेली आहे. ज्यावेळेला स्थायी समितीने बजेटला मंजुरी दिली होती. त्यावेळेला आपल्याला ही तरतूद करणे योग्य वाटत होती कारण त्यावेळेला कोरानाचा संसर्ग आपल्या पर्यंत पोहोचलेला नव्हता आपण ही तरतूद केली आणि त्यानंतर मग आपल्याला कोविडसाठी यंत्रणा उभी करावी लागेल व त्यासाठी महानगरपालिकेला खर्च करावा लागेल आणि म्हणून ही तरतूद प्रशासनाकडून एवढीच करण्यात आलेली आहे. त्यामुळे ५ लाखांची म्हणून ती तरतूद करण्यात आलेली आहे प्रशासनाकडून त्यामुळे तरी मी आता महासभेला विनंती करते की ५ लाखांची ही तरतूद आहे तरी संसर्गजन्य रोगांचे उपाय आणि नियंत्रण या हेडखाली ती तरतूद ५ लाखांच्या ऐवजी ती वाढवून घेवुन ५ कोटींची करण्यात यावी आणि ती आपल्या शिल्लकीच्या अंदाजपत्रकातून करू शकतो. त्यामुळे ती वाढवण्याची प्रशासनाने याची नोंद घ्यावी . शेवटी मी ऐवढेच म्हणेन मला दुख: आहे कि, मागील काळात पायाभुत सोईंचा खुप मोठा अनुशेष आहे. मला आनंद आहे तर तो जळगांव शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भरघोस तरतूद असणारा अर्थसंकल्प स्थायी समितीने मांडण्याचे प्रयत्न केलेले आहेत आणि आम्हाला विश्वास सुध्दा आहे जळगांव शहरातील पायाभुत सोईसुविधांचा जो अनुशेष आहे आणि त्याने सर्वसामान्य जळगांव शहरातील नागरीकांचे आयुष्य समाधानी करू शकु याची मला आशा आहे. तरी महासभेने अंदाजपत्रकाला मंजुरी द्यावी अशी मा.महापौरांकडे स्थायी समितीच्या वतीने विनंती करते धन्यवाद .

**मा.महापौर :-** नितीन भाऊ आपण बोला

**श्री.नितीन लद्ढा :-** होय महापौर साहेब बोलतोय. मा.महापौर ताई साधरणत: या ऑनलाईन सभेमध्ये आपल्या सन्मा.सभापती शुचिताताईंनी अर्थसंकल्पामध्ये ज्या वाढ करण्याच्या सुचना केल्या त्या

मध्ये सन्मा.सदस्य सचिन भाऊ पाटील या कोविड च्या महामारीच्या अनुषंगाने ५० टक्के घरपट्टी माफीचा प्रस्ताव हा आजच्या या महासभेपुढे ठेवलेला आहे . आपला हा अर्थ संकल्प मान्य करत असतांना हि ५० टक्के सुट माफ करतांना हि पुढच्या महासभेमध्ये मान्य केली तर साधारणत: सगळयात मोठ आर्थिक उत्पन्नाचे जे स्त्रोत आहे आपलं घरपट्टीचे जे ५० टक्के जे उत्पन्न आहे आपलं तर त्याच्यामध्येही आपल्याला तुट येवुन पडते आहे आणि ५० टक्के जी आपण सुट देणं म्हणजे साधारणत: आपण जी काही रक्कम सुट देतात तर त्या संदर्भात ५० टक्के सुट देण्याबाबतचा प्रस्ताव पुढच्या महासभेमध्ये मान्य करायचा असेल तर त्यावेळी ही ५० टक्के सुटीची रक्कम तर ती सुध्दा तरतुद ह्या उत्पन्ना मध्ये करावी लागेल कारण प्राधान्याने याच्यावर अंवलंबुन जी रक्कम आहे. त्याच्या मध्ये सुध्दा फेर दुरूस्ती करावी लागेल. या विषयाच्या अनुषंगाने ही सुचना आहे आणि या मिटींगला या सुचनेच्या अनुषंगाने विचार व्हावा.

**मा.उपमहापौर :-** नितीन भाऊ जी ५० टक्केची सुट तुम्ही म्हणत आहेत ना त्याचे आपण आधी शासनाकडे अनुदान मागणार आहेत. शासनाने जर आपल्याला अनुदान दिले तर आपण ती ५० टक्के सुट देण्याचा विचार करणार आहोत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे.

**मा.उपमहापौर :-** शासनाकडून जर आपण अनुदान मागणार आहे, नितीन भाऊ आपण शासनाला अनुदान मागणार आहे.

**मा.महापौर :-** नितीन भाऊ

**मा.उपमहापौर :-** नितीन भाऊ ऐकू येते आहे का ?

**मा.महापौर :-** नितीन भाऊंचा आवाज येत नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तर यासंदर्भात प्रशासनाने या सुचने कडे व या भुमिकेकडे लक्ष ठेवणे अपेक्षित आहे नाहीतर विनाकारण याचे घरपट्टीच्या उत्पन्नावर परिणाम होईल नाहीतर त्याचे परिणाम येणाऱ्या काळात शहरातील विकास कामांवर होईल, या अनुषंगाने मा.आयुक्त महोदयांनी खुलासा व्यवस्थित पणे केला तर बरे होईल.

**मा.आयुक्त :-** आदरणीय महापौर , आदरणीय उपमहापौर, आदरणीय सभागृह ज्येष्ठ सन्मा. सदस्य श्री नितीन भाऊंनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्या अनुषंगाने आता आपण अर्थसंकल्पाच्या बैठकीच्या संदर्भामध्ये आपण चर्चा करतोय तर या थोडस पुर्ण अश्या कार्यपध्दतीला अनुसरून सर्वप्रथम मी पुर्ण स्थायी समितीच्या सर्व सदस्य आणि संपुर्ण सदस्यांचे पुर्ण महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून जमा खर्चाच्या बाजुंचा विचार करून महानगरपालिकेचे उत्पन्न कसे वाढवता येईल आणि त्या अनुषंगाने आपल्याला शहरातील पायाभुत सुविधांचा विकास कसा करता येईल. त्याचा खुप सुंदर अभ्यास करून एक चांगलं बजेट हे महासभेसमोर मांडलेले आहे. आत्ताच मा.स्थायी समिती सभापती यांनी मांडल्याप्रमाणे गेल्या ५ महिन्यामध्ये कोरोना मध्ये गेलेले आहेत. जे काही आर्थिक चक्र हे बऱ्यापैकी थांबलेलं आहे याचा परिणाम जागतिक आर्थिक व्यवस्थेवर झालेला आहे व त्याच्यामुळे याचा परिणाम महानगरपालिकेच्या उत्पन्नावरही तो होणार आहे. परंतू त्या दृष्टीने आपण मागच्या बैठकांमध्ये सर्व गटनेते व पदाधिकारी यांच्याशी चर्चा करून महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीच्या दृष्टीने ज्या उपाययोजना आपण करणार होतो तर त्या गोष्टी उर्वरीत काळामध्ये आपल्याला करता येईल. आता या पार्श्वभुमीवर जे काही मा.स्थायी समिती सभापती यांनी त्यांनी त्याच्या भाषणामध्ये ज्या काही अपेक्षा व्यक्त केलेल्या आहेत. तर त्या महानगरपालिकेच्या दृष्टीने अतिशय उपयोगी अश्या आहेत आणि मी ग्वाही देतो की प्रशासनाच्या

वतीने ज्या काही स्थायी समितीने आपल्या दुरूस्त्या व्यक्त केलेल्या आहेत येणाऱ्या आर्थिक वर्षामध्ये महासभेने मान्यता दिल्यानंतर आपण जे काही सगळे जे प्रकल्प आहेत ते स्थायी समितीने ते आपण या आर्थिक वर्षामध्ये पुर्ण करण्याच्या दृष्टीने पुर्ण कसोशीने प्रयत्न करू. जो मुद्दा मा.नितीनभाऊंनी मांडलेला होता की , आपल्याला घरपट्टी मध्ये सवलत देण्याच्या संदर्भामध्ये सन्मा.सदस्यांनी एक प्रस्ताव या नंतरच्या सभेमध्ये मांडलेला आहे तर आताच्या प्रस्तावाच्या वेळेला आपण या विषयावर चर्चा केली नाही तर बर राहील अस मला वाटत तर आजच्या या अर्थसंकल्पावरच्या सभेमध्ये कुठलेही विषय नाहीये परंतू जो मुद्दा आपण उपस्थित केला की त्याचा परिणाम हा अर्थसंकल्पावर निश्चित होणार आहे आणि अशा वेळेला मला असं वाटत जो अर्थसंकल्प स्थायी समितीने सादर केलेला आहे तो मा.महासभेने योग्य वाटुन त्याप्रमाणे तो आपण जर निर्णय घेतला तर याच्यानंतरची जी काही आर्थिक परिस्थितीचे काही पुढील परिणाम आहेत. त्यावेळेला आपण या आर्थिक वर्षाचे जे सुधारीत बजेट आहे ते साधारण आपण नोव्हेंबर, डिसेंबर मध्ये तयार करू त्यावेळेला आपल्याला या सगळयांचा एकत्रित विचार याचा करायचा आहे. त्यावेळेला कोरोनामुळे आपल्या आर्थिक परिस्थितीवर काय परिणाम होणार आहे , गाळयांचा मुदतवाढीचा विषय आहे. मा.स्थायी समिती सभापतींनी अनेक काही उत्पन्न वाढीचे पर्याय सुचविलेले आहेत. या सगळया पर्यायाची व्यवहार्यता तपासल्या नंतर त्या पैकी किती पर्याय आपल्याला या आर्थिक वर्षामध्ये उपलब्ध होताहेत आणि त्याचा आपल्या जमेवर काय परिणाम होतो याचा आपल्याला पुन्हा सुधारीत अर्थसंकल्पावर याचा पुन्हा विचार करता येईल. तर माझी मा.नितीनभाऊंना विनंती राहील की आपण पुढच्या सभेमध्ये ज्यावेळेला या विषयावर चर्चा करू त्यावेळेला आपण या सगळयाचा विचार करू याच्या कायदेशीर बाबी व व्यवहार्यता याबाबत आणि या सगळयांचा एकत्रित परिणाम महानगरपालिकेवर काय होणार आहे याचा आपण यथावकाश विचार करू आणि याचा आपण ज्यावेळेला सुधारीत अर्थसंकल्पाच्या वेळेला करूया. आत्ता मला अस वाटत नाही की या वर आपण चर्चा करू आता आपल्याला आवश्यकता नाही. मात्र आपल्याला सुधारीत अर्थसंकल्पामध्ये जमा आणि खर्च बाजुच्या होणाऱ्या कटौती या दोन्ही वर एकत्रित विचार करून आपल्याला या सुधारीत अर्थसंकल्प हा आपल्याला पुन्हा करावा लागेल. माझी विनंती अशी राहील की आपण या सुधारीत अर्थसंकल्पावरची चर्चा पुढे न्यावी आणि ज्यावेळी पुढच्या बैठकीत हा विषय सन्मा.सदस्यांनी मांडलेला आहे त्यावेळेला आपण या विषयावर चर्चा करावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आयुक्त महोदय आपण प्रत्येक वेळेच्या अर्थसंकल्पाच्या अनुषंगाने सांगतो प्रत्येक वेळी आपण अर्थसंकल्प मांडत असतो आणि अर्थसंकल्प उत्पन्नाच्या बाजुवरती कायम करण्यात येतो आणि उत्पन्नवाढीचे वेगवेगळे पर्याय स्थायी समिती च्या माध्यमातुन मी अध्यक्ष महोदयांना सांगु ईच्छितो कि, हा जो अर्थसंकल्प आहे हा मागील ३१ मार्च २०२० ला आत्तापर्यंतचे जे घरपट्टी चे उत्पन्न हे आज पर्यंत ५४ टक्क्यांच्या वर गेलेले नाहीये. कोविड ची सुरूवात साधारणत: नंतर झालीये परंतू जो पर्यंत प्रशासन आपल्या वसुलीचे उद्धिष्ट पुर्ण करत नाही तोपर्यंत या कामानिमित्त मा.स्थायी समितीच्या वतीने जो अर्थसंकल्प सादर केलेला आहे तो निश्चित चांगला आहे. परंतू अर्थसंकल्प मंजुर करण्याच्या दृष्टीकोनातुन जोपर्यंत प्रशासन गांर्भीयाने विचार करून उत्पन्न मजबुत करून ते किती चांगल्या पध्दतीने आपल्याला वसुल करता येईल आणि यासाठी मा.सभापती यांनी मांडलेल्या पर्यायांची उध्दीष्ट पुर्ती व्हावी हीच प्रशासनाकडून माफक अपेक्षा करतो स्थायी समितीच्या वतीने मंजुर केलेला अर्थसंकल्प या महासभेमध्ये सर्वानुमते मान्य करण्यात यावा अशी मी विनंती करतो .

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब .

**मा.महापौर :-** बोला आप्पासाहेब .

**मा.महापौर :-** आवाज येत नाहीये .

**मा.उपमहापौर :-** आप्पा आवाज व्यवस्थित येत नाहीये .

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब .

**मा.उपमहापौर :-** हो आप्पा आवाज येतोय बोला .

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब आता नितीन भाऊंनी जो विषय मांडला की घरपट्टीचे उत्पन्न ५४ टक्के आहे व हा जो विषय आपण प्रस्तावित केलेला आहे व आपण भारतीय जनता पक्षातर्फे त्यांना रिक्वेस्ट केलेली आहे की त्यामुळे आपण त्याकरीता शासनाकडून अनुदान मागवावं व अनुदान आल्यानंतर महापालिका त्यांना ते माफ करणार आहे , शासनाकडेही आपण पाठवले आहे व लोकांना आवाहनही केले आहे तसे की त्यांनी कॅश भरावी आणि शासनाकडुन आल्यानंतर आपण त्यांनी भरल्यानंतर आपण ते पुढच्या वर्षात ॲडजेस्ट करणार आहोत अस आपण आवाहन केलेलं आहे तरी हे व्हाव अशी विनंती आहे.

**श्री.सुनिल महाजन,विरोधी पक्षनेते :-** महापौर साहेब मला परवानगी द्यावी.

**मा.महापौर :-** बोला बोला सुनिलभाऊ

**श्री.सुनिल महाजन,विरोधी पक्षनेते :-** राज्य शासनाची आर्थिक परिस्थिती व जळगांव महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती ही ईतकी बिकट आहे .

**मा.महापौर :-** विशाल भाऊ स्पिकर बंद करा.

**श्री.सुनिल महाजन,विरोधी पक्षनेते :-** येतोय का आवाज

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हो येतोय

**मा.उपमहापौर :-** विशाल भाऊ स्पिकर बंद करा.

**श्री.सुनिल महाजन,विरोधी पक्षनेते :-** ज्या पध्दतीने आपल्या जळगांव महानगरपालिकेची परिस्थिती गंभीर आहे त्याच पध्दतीची राज्य शासनाची परिस्थिती सुध्दा गंभीर आहे. आपण आता राज्य शासनाकडुन मागणी करतोय माझी विनंती की याबाबत हे अनुदान केंद्र शासनाकडुन मागण्यात यावं कारण राज्य शासनाची परिस्थिती जळगांव महानगरपालिकेसारखीच आहे. तसेच जळगांव महानगरपालिकेत भाजपची सत्ता आहे व केंद्र शासनात सुध्दा भाजपचीच सत्ता आहे तरी केंद्र शासन जळगांव महापालिकेची विनंती नक्की मान्य करतील म्हणून माझी विनंती आहे की केंद्र शासनाकडून अनुदान मागविण्यात यावे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब.

**मा.उपमहापौर :-** आवाज येत नाहीये.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब, महापौर साहेब, महापौर साहेब.

**मा.उपमहापौर :-** बोला बोला आप्पा.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब सर्वानुमते मान्य करण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** ताई मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** विशाल भाऊ तुम्ही बोला आता.

**मा.उपमहापौर :-** विशाल भाऊ बोला व दोन मिनिटांत आटोपा.

**मा.महापौर :-** विशाल भाऊ तुम्ही बोला थोडक्यात व दोन मिनिटांत संपवा. विशाल भाऊ बोला .

**मा.उपमहापौर :-** आवाज येत नाहीये.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** प्रशासनाने मांडलेला अर्थसंकल्प चांगल्या पध्दतीने केलेला आहे पण त्याच्यात संपुर्ण शहराचा आपण विकास करू शकतो का ? त्यामध्ये मार्केट चे विषय व रस्त्यावरील हॉकर्स वाल्यांपासुन गाळयांचा नुतनीकरणाचा प्रस्ताव आपल्याकडेस अजुन या ठिकाणी बऱ्याच दिवसापासुन पेंडींग आहे. तो अजुन महासभेकडे आलेला नाही . त्यानंतर घरपट्टीचे मोठया प्रमाणामध्ये सर्वेक्षण झालेले आहे त्या लोकांची सुनावणी आत्तापर्यंत झालेली नाहीये. तर या मध्ये या गोष्टींच्या संदर्भामध्ये त्यांनी तात्काळ कार्यवाही करावी अशी माझी प्रशासनाला विनंती राहील. कारण आपण ज्यावेळी बजेट सादर करतात. त्या सुचनांची अंमलबजावणी केली म्हणजे आर्थिक परिस्थिती सुधारणे शक्य होईल आणि हे त्याच्यावर जळगांव शहराचा विकास अंवलंबुन आहे व तो होवू शकतो.

**मा.महापौर :-** ज्योतीताई तुम्ही बोला.

**सौ.ज्योती चव्हाण :-** मा.महापौर ताई, मा.आयुक्त साहेब आज जी बजेट संदर्भातील मिटींग आहे. तर मी त्याबद्दल सभापती मॅडम यांच अभिनंदन करते की ईतकी सुशिक्षित महिला आपल्याला लाभली आहे व अतिशय सुंदररित्या असा बजेट त्यांनी सादर केलेला आहे. तरी प्रशासनाला एक सुचना करत आहे कि, आपली जी वसुली आहे ती फारच कमी प्रमाणात असते आणि दुसरे म्हणजे वाघुर चे जे बिल आहे लाईट बिलाचा सर्वात जास्त मोठा खर्च आपल्याला ईथे जाणवलेला आहे तर तो आहे त्याच्याबद्दल काही दुमत नाही पण तो कसा कमी करता येईल आज जळगांव शहरातील सगळया जागा आपल्याकडे आहे पण जर आपल्याला सौर उर्जेसाठी काही करता आले तर त्याची तरतूद करावी तर आपल्याकडे इंजिनियरींग कॉलेजचे काही विद्यार्थी आहे की जे प्रकल्प करतात तर हायड्रोलिक पाण्यावर जर आपल्याला विज निर्मिती करता आली तर आपण हया कॉलेजांना तसं पत्र पाठवुन काही करता आलं तर आपल्या महापालिकेचा तो भार कमी हाईल असं मला वाटतं. तसेच मा.सभापती ताईंनी बालनाट्यगृहासाठी जी तरतूद केलेली आहे ती जळगांव शहराचा सांस्कृतीक वारसा बघता आपण ती पुर्ण करावी अशी माझी एक ईच्छा आहे आणि प्रशासनाने आपला जो बजेट सादर केलेला आहे. तो १०० टक्के जो सभेमध्ये सादर करतो प्रशासन ते कामं पुर्ण करत नाही आणि जो बजेट सादर करतोय त्यामधील ५० टक्के जरी काम पुर्ण केलं तर जळगांव शहराच्या विकासाची वाटचाल पुढे जाईल असे मला वाटते आणि मला दुसरा एक विषय मांडायचा आहे की मेहरूण तलाव सध्या अतिशय पुर्ण पाण्याने भरलेला आहे. त्या मेहरूण तलावावर जर बिओटी तत्वाने जर एखादा प्रकल्प कोणाला देता आला तर आपण त्याची तरतूद करावी. बोटींग सारखी जर व्यवस्था केली तर आज जळगांव शहर मनपाच्या आर्थिक उत्पन्नात नक्की वाढ होईल. असे मला येथे सांगायचे आहे तसेच हा बजेट महासभेने मान्य करावा आणि परत मी स्थायी समितीला शुभेच्छा देते की त्यांनी अतिशय सुंदर असा बजेट मांडला व महापालिकेच्या उत्पन्नाचा विचार त्यांनी अतिशय चांगल्या पध्दतीने केला आहे त्यांनी उत्पन्नाचे वेगवेगळे स्त्रोत त्यांनी आपल्याला येथे सादर केलेले आहे.त्याप्रमाणे प्रशासनाने त्याची कार्यवाही करावी एवढीच मी प्रशासनाला विनंती करते. धन्यवाद.

**मा.महापौर :-** भगतभाई बोला फक्त २ मिनिटं भगतभाऊ बोला.

**श्री.भगतराम बालाणी :-** सुनिल भाऊ महाजन यांनी जो विषय येथे मांडला की केंद्रामध्ये आपली सत्ता आहे व आपण अनुदान मागा तर आपण राज्य शासनाकडे पत्र पाठवा , गाळे संदर्भातील जो प्रश्न आहे आणि तो रस्त्यावरही बसु शकतो तर तो एक प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पाठवावा आणि तो ते जेव्हा अनुदान येईल आणि त्या अनुषंगाने ते काम करावे आणि पुढच्या महासभेत ती मागणी घ्यावी.

**मा.महापौर :-** सुचक व अनुमोदक कोण आहेत.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ढेकळे दादा सुचक आणि पोकळे साहेब अनुमोदक आहेत.

**नगरसचिव :-** नमस्कार सर्वानुमते , बजेट जो आहे सुनिलभाऊ  आदरणिय सुनिल भाऊ सर्वानुमते मंजुर करायचे आहे का बजेट ? सुनिल भाऊ

**श्री.सुनिल महाजन,विरोधी पक्षनेते :-** हो.

**नगरसचिव :-** रियाजभाई .

**श्री. ईब्राहीम पटेल :-** हो सर्वानुमते मंजुर करावा.

**नगरसचिव :-** रियाजभाई मंजुर आहे का ? आदरणीय रियाजभाई बोला .

**मा.उपमहापौर :-** रियाजभाई बोलो .

**नगरसचिव :-** रियाजभाई सर्वानुमते मंजुर आहे का ?

**श्री.रियाज बागवान :-** होय मंजुर आहे.

**नगरसचिव :-** सर्व आदरणीय सन्मा.सदस्यांना विनंती आहे की आपला जो माईक आहे तो बंद ठेवा.

**श्री.सुनिल खडके :-** सर्वानुमते मंजुर आहे पण थोड लवकर घ्या.

**मा.उपमहापौर :-** प्रशांतभाऊ माईक बंद करा. ईबाभाई माईक बंद करा.

**नगरसचिव :-** आता आपले मुख्यलेखाधिकारी पवार साहेब बोलताहेत .

**श्री.कपिल पवार, मुलेअ. :-** सन्मा.महापौर सन्मा.उपमहापौर ,मा.आयुक्त, मा.स्थायी समिती , सभापती आजचे बजेट आपण मान्य केल्याबद्दल मी प्रशासनाकडून आपले आभार व्यक्त करतो . फक्त याच्यामध्ये ऑडीट च्या काही तांत्रिक बाबी बदलायच्या आहेत. तर त्या आम्ही ते बदलतांना आपल्या काही खर्च किंवा धोरणावर परिणाम होणार नाही यातील काही ज्या तांत्रिक बाबी ज्या आहेत त्यासुध्दा आपण डिलीट करू शकतो तर त्याला सुध्दा मंजुरी द्यावी विनंती .

**श्री.कैलास सोनवणे :-** हो मंजुर आहे, मंजुर आहे. अश्विन भाऊ

**मा.उपमहापौर :-** होय.

**श्री.कैलास सोनवणे :-** साहेबांना म्हणावं मंजुर आहे.

**श्री.ईब्राहीम पटेल  :-** मंजुर आहे.

**मा.महापौर :-** सदरची विशेष महासभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी आता दुसऱ्या सभेच्या सुरूवातीला वंदेमातरम न घेता पुढील महासभेला सुरूवात करावी व सदर सभा संपल्यानंतर राष्ट्रगीत घेण्यात यावे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौर ताई, महापौर ताई.

**मा.उपमहापौर :-** दुसरी महासभा सुरु होत आहे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौर ताई, महानगरपालिकेला मिळणारे उत्पन्न ते नियमानुसार अधिनियमात राहुन प्रशासनाने हे सर्व कराव.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२६४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, सन २०१९-२० चे सुधारीत अंदाज पत्रकासह सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाचे अंदाजपत्रकास स्थायी समितीने ठराव क्र.२३८ दि.१३/०३/२०२० अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे.

स्थायी समितीने मंजुर केलेल्या अंदाजपत्रकात संसर्गजन्य रोगांचे उपाय आणि नियंत्रण या लेखाशिर्षाखाली रु.५ लक्ष तरतूद केलेली आहे सदर रक्कम रु.५ लक्ष ऐवजी रक्कम रु.५ कोटीची

तरतुद करण्यात यावी व त्यानुसार प्रशासनाने अंदाजपत्रकात आवश्यक त्या फेर दुरुस्त्या करुन नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही सत्वर करुन घ्यावी. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीच्या अनुषंगाने जळगांव शहर महानगरपालिकेचे सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रक अपेक्षित योग्य त्या दुरुस्त्यांसह परिपुर्ण अर्थसंकल्पाची प्रत सर्व सन्मा.सदस्यांना वितरीत करण्याची दक्षता घ्यावी. तसेच सदर अंदाजपत्रकाच्या छपाईसाठी येणाऱ्या खर्चासही याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- ढेकळे सदाशिव गणपतराव**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

येणे प्रमाणे सभेचे कामकाज संपन्न झाले.

**सही/-**

**(भारती कैलास सोनवणे)**

**महापौर**

**जळगांव शहर महानगरपालिका जळगांव**